पोलीस उप आयुक्त, वाहतूक, नवी मुंबई

दिनांक :— १६/०१/२०२३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेस नोट

## “ रस्ता सुरक्षा सप्ताह —२०२३”
## समारोप समारंभ सोहळा

देशात व राज्यात घडणारे रस्ते अपघात व त्यात जखमी होणारे व मृत्यूमुखी पडणारे नागरिकांची संख्या कमी करण्याचे दृष्टीने दरवर्षी वाहतुक सुरक्षा सप्ताह आयोजित करण्यात येत असतो.

सालाबादप्रमाणे यावर्षी देखील, नवी मुंबई वाहतुक विभागातर्फे जनतेमध्ये व वाहनचालकांमध्ये वाहतुक सुरक्षेविषयी जनजागृती निर्माण व्हावी याकरिता दिनांक ११/०१/२०२३ ते १७/०१/२०२३ या कालावधीत रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन केलेले होते. त्यामध्ये नवी मुंबई वाहतुक विभागाने नाविन्यपुर्ण कार्यक्रम आखुन व्यापक जनजागृती करण्यात आलेली आहे.

सदर रस्ता सुरक्षा सप्ताह कार्यक्रमाचा समारोप समारंभ सोहळा दि. १७.०१.२०२३ रोजी १०.०० वा. चे सुमारास, विष्णूदास भावे नाटयगृह, वाशी, नवी मुंबई येथे मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई श्री. मिलिंद भारंबे यांचे अध्यक्षतेखाली, मा. श्री. राजेश नार्वेकर, भा.प्र.से., आयुक्त—नवी मुंबई महानगरपालिका, मा. पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई श्री. संजय मोहिते, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, नवी मुंबई श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ — २, नवी मुंबई श्री. पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ — १, नवी मुंबई श्री. विवेक पानसरे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक, नवी मुंबई श्री. तिरुपती काकडे, सहायक पोलीस उप आयुक्त, वाहतुक, नवी मुंबई श्री. राहुल गायकवाड, सर्व युनिट प्रभारी अधिकारी व अंमलदार वाहतुक शाखा, नवी मुंबई, तसेच नवी मुंबई महानगरपालीका, सिडको प्रशासनाचे पदाधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी व अभिनेते श्री. स्वप्निल जोशी यांचे उपस्थितीत संपन्न होणार आहे. सदर कार्यक्रमाकरिता नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील विविध शाळांचे शिक्षक व स्काउड गाईडचे विदयार्थी तसेच पालक, विविध सेवाभावी संस्थाचे पदाधिकारी, पत्रकारबांधव यांनी उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे नवी मुंबई वाहतुक विभागाकडुन आवाहन करण्यात येत आहे.